पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

# दैनिक अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३६ ■ बुधवार, दि. ९ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -336 ■ Wednesday, 9 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# सर्वपक्षीय समित्यांसह मनपालाही पडला चक्रवर्ती सम्राट अशोकांचा विसर!

**सम्राट अशोक मौर्य यांचा जन्म इ.स.पू.३०४मध्ये झाला असावा असा अंदाज वर्तवला जातो. हे भारतीय सम्राट आणि मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते. त्यांनी प्राचीन भारतावर इ.स.पू. २७२ – इ.स.पू. २३२ दरम्यान राज्य केले. त्यांना चक्रवर्ती सम्राट अशोक, महान अशोक आणि अशोक द ग्रेट नावांनीही ओळखले जाते. अशोक हे भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा बहुतांश भाग काबीज केला होता. आपल्या सुमारे ४० वर्षांच्या विस्तृत राज्यकाळात त्यांनी पश्चिमेकडे अफगाणिस्तान व थोडा इराण, पूर्वेकडे आसाम तर दक्षिणेकडे म्हैसूरपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. त्यांना सम्राट अशोक मौर्य, धम्माराखित, धर्माराजिका, धम्माराजिका, धम्म रज़, चक्रवर्ती, सम्राट, राज़श्रेष्ठ, मगधराज, देवानाम प्रिय:, प्रियदर्शी, भूपतिं, मौर्यराजा, धम र्शिोक, धम्मशोक, अशोकवर्धन, प्रजापिता, धम्मानायक, धर्मनायक, अशोक महान अशा अनेक नावाने ओळखले जाते.**

## मोठ्या मोठ्या गप्पा मारणाऱ्या समित्यांचेही दुर्लक्ष

**दिनेश परदेशी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती संपूर्ण देशात साजरी करण्यात आली परंतु छत्रपती संभाजीनगरात इतर महापुरूषांच्या जयंती साजरी करीत असताना चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीचा मात्र सत्ताधाऱ्यांसह, सर्व पक्षीय समित्या व मनपालाही पडला विसर पडला.

मोंढा नाकाजवळ असलेल्या सम्राट अशोक चौकात कमीत कमी जयंतीच्या दिवशी तरी स्वच्छता करून सुशोभिकरण करावे असे सर्वसामान्य जनतेला वाटते. इतकी निराशा का? ज्यांच्या नावाने लाभ घेतात त्यांचेही दुर्लक्ष संपूर्ण चौक खिळखिळा झाला आहे.

राजकारण करण्यातून वेळ मिळत नसल्यानेच या महानुभवांचे याकडे दुर्लक्ष झाले असावे.

चौक सुशोभिकरणावर करोडो रूपयांचा खर्च झाला असल्याचे अधिकारी सांगतात. परंतु प्रत्यक्षात मात्र हाच सम्राट अशोक चौक का वंचित राहीला. जी-२० अंतर्गत देखील सुंदर शहरचा नारा देणारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष तरी कसे? या चौकातून दररोज हजारो, लाखो नागरिकांची ये-जा होत असते. इतका महत्त्वपूर्ण चौक असून चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे नाव या चौकाला असताना देखील इतका तिरस्कार का? एक दोन संघटना यास अपवाद आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आता रात्रीस लाईटींगच्या माळा टाकण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आपल्या भावना मात्र व्यक्त केल्या.






‘मी नगरसेवक असताना सम्राट अशोक चौकाचे सुशोभिकरण केले होते. जी-२० अंतर्गत या चौकाचे सुशोभिकरण करायला पाहिजे होते. परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे चौकाचे सुशोभिकरण खोळंबले. याकडे मनपा प्रशासनाने देखील लक्ष घातले पाहिजे.

**- सतीष कटकटे ,**
माजी नगरसेवक शिवसेना

## ‘आपले सरकार’ पोर्टलची सेवा पाच दिवस बंद

मुंबई : ‘आपले सरकार’ पोर्टलची सेवा नियमित व तांत्रिक देखभालीसाठी १० ते १४ एप्रिल, २०२५ अशी पाच दिवस बंद राहील. या कालावधीत ‘आपले सरकार’ सेवा पोर्टलमार्फत दिली जाणारी कोणतीही सेवा उपलब्ध असणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळिवले आहे.

या काळात कार्यालयीन कामकाजाचा फक्त एक दिवस वगळता उर्वरित सर्व दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्रामीण आणि शहरी भागातील ‘आपले सरकार’ केंद्र चालक, ‘सेतू’ केंद्र चालक, संबंधित ग्रामपंचायती आणि शासकीय कर्मचारी यांनी कृपया या पूर्वसूचनेची नोंद घ्यावी, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## तीन दिवसीय रामनवमी उत्सवात साईचरणी ४ कोटीचे घसघशीत दान

शिर्डी : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या वतीने आयोजीत केलेला श्रीरामनवमी उत्सव शनिवार दि.०५ एप्रिल ते सोमवार दि.०७ एप्रिल या कालावधीत संपन्न झाला. या उत्सव कालावधीत एकूण रुपये ४ कोटी २६ लाख ०७ हजार १८२ इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यामध्ये रोख स्वरुपात रुपये ०१ कोटी ६७ लाख ८९ हजार ०७८ दक्षिणा पेटीत देणगी प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ७९ लाख ३८ हजार ८३० रुपये, पी.आर.ओ. सशुल्क पास देणगी ४७ लाख १६ हजार ८००, ऑनलाईन चेक डीडी, मनिऑर्डर, डेबीट क्रेडीट कार्ड, युपीआय याद्वारे ०१ कोटी २४ लाख १५ हजार २१४, सोने ८३.३०० ग्रॅम रक्कम रुपये ०६ लाख १५ हजार ७८२ व चांदी २०३०.४०० ग्रॅम रक्कम रुपये ०१ लाख, ३१ हजार ४७८ यांचा समावेश आहे.

श्रीरामनवमी उत्सव कालावधीत साधारणतः अडीच लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला, उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ६१ हजार ५२९ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला तर दर्शन रांगेत ०१ लाख ७६ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले.

या कालावधीत ३ लाख ६३ हजार ०७४ लाडूप्रसाद पाकिटांची विक्री झाली असून त्या माध्यमातून ७२ लाख ६१ हजार ४८० रूपये प्राप्त झाले. उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. असे भिमराज दराडे यांनी सांगितले.

## आधी अत्याचार नंतर हत्या ; १० वर्षीय चिमुकलीच्या मृत्यूने मुंब्र्यात खळबळ

मुंब्रा : मुंब्र्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. मुंब्र्यात १० वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली आहे. सोमवारी रात्री १२ च्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेने मुंब्र्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंब्रा ठाकूरपाडा परिसरातील मुंब्रादेवी अपार्टमेंट येथे एक १० वर्षीय मुलगी आपल्या इमारती खाली इतर मुलींसोबत खेळत होती. शेजारच्या श्रद्धा प्राप्ती इमारतीत राहणाऱ्या नराधम आसिफ अकबर मन्सूरी (वय १९) याने पिडीत मुलीबरोबर खेळताना गोड बोलून तिला खेळणी देण्याच्या बहाण्याने श्रध्दा अपार्टमेंट इमारतीमध्ये घेऊन गेला व तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करून इमारतीच्या व्हेंटिशन डक्ट मध्ये फेकून दिले. काल (दि ७) रात्रीच्या सुमारास श्रद्धा प्राप्ती इमारतीच्या व्हेंटिशन डक्ट मध्ये इमारती वरून काही तरी जड वस्तू खाली पडल्याचा आवाज आल्याने उपस्थित रहिवाशी घटनास्थळी धावले. रहिवाशांनी घडलेल्या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मुंब्रा पोलिसांनी अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने रूम क्रमांक १०३ च्या स्वच्छता गृहाच्या बाजूला असलेल्या उघड्या खिडकीतून बॅटरीचा साह्याने पाहिले असता अर्ध नग्न अवस्थेत मृतदेह असल्याचे निदर्शनात आले अग्निशमन दलाच्या जवानांनी सीडीच्या साह्याने या डक्ट मध्ये उतरून या मुलीचा मृतदेह बाहेर काढला . दरम्यान या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## १८ जूनपासून पालखी सोहळ्याला सुरुवात, ६ जुलै रोजी पंढरपूरमध्ये होणार आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा

पुणे : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असलेली आषाढी वारी यंदाही मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी) आणि संत तुकाराम महाराज (देहू) यांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार आहेत.

आळंदी येथून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा प्रस्थान सोहळा १९ जून २०२५ रोजी संजीवन समाधी मंदिरातून होणार आहे. तर देहू येथून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे प्रस्थान १८ जून २०२५ रोजी होईल. पालखी मार्गावर एकूण १७ मुक्काम असतील आणि ६ जुलै २०२५ रोजी पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा पार पडणार आहे.

यंदा माऊलींची पालखी २२ जून रोजी सासवडमध्ये पोहोचणार आहे. त्यानंतर २३ जूनला मुक्काम, आणि २४ जून रोजी सासवडहून पुढील प्रस्थान होणार आहे. आळंदी देवस्थानकडून संपूर्ण पालखी मार्गाचा आणि मुक्कामस्थळांचा आढावा घेतला जात आहे. सासवडमधील पालखी तळ, रस्त्याचे काम, व अन्य व्यवस्थांसाठी तयारीला वेग आला आहे. सध्या फक्त संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांच्या प्रस्थानाची तारीख समोर आली आहे. परंतु संपूर्ण वेळापत्रक अद्याप समोर आलेले नाही.

## देवगिरी किल्ला आगीच्या विळख्यात!



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगरमधील देवगिरी किल्ला आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची बातमी समोर आली आहे. भर उन्हाच्या कडाक्यात देवगिरी किल्ल्याला सकाळच्या सुमारास भीषण आग लागली आहे. या आगीत ऐतिहासिक वास्तूचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीला आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर मधील इतिहासामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा साक्षीदार असलेल्या दौलताबाद अर्थात देवगिरी किल्ल्याला चारही बाजुंनी आगीने घेरले आहे. आज सकाळी ८च्या दरम्यान ही आग लागली असल्याची माहिती मिळाली आहे. उन्हाळ्याच्या झळांमुळे ही आग भडकली असल्याची प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. देवगिरी किल्ल्याच्या चारही बाजूंना आगीचे लोट पसरलेले आहे. तसेच आसपासच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमणांत धूर पसरला असल्याचे समजते आहे.

यादरम्यान किल्ल्यावर वास्तव्यास असलेले लहान मोठे जीवाणू प्राणी जळून नष्ट झाले असून, मोर, लांडोर, माकडं आदि प्राणी सौरावैरा पळू लागली आणि त्यांनी किल्ल्याच्या परिसरातील शेतात आश्रय घेतला.

किल्ला प्रशासनाने अग्निशमन विभागाला कळवल्यानंतर अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु, अग्निशमन दलाच्या वाहनाला किल्ल्यात प्रवेश करण्यात बऱ्याच अडचणी निर्माण होत होत्या. आग विझवण्याचे कोणतेही साधन नसताना त्या ठिकाणी असलेल्या हिरव्या झाडाच्या फांद्या तोडून आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान ही आग कशामुळे लागली याची पोलीस चौकशी करत आहेत.

## जनसमर्थन पत्रकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१८व्या आणि १९व्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी आणि अन्य पाश्चिमात्य राष्ट्र आणि भारतामध्ये ज्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळी किंवा परिवर्तन झालीत, त्यात वृत्तपत्राचे योगदान मोलाचे आहे. जागतिक, राष्ट्रीय आणि स्थानिक घडामोडी समाजापर्यंत येणारे वृत्तपत्र हे एक प्रमुख साधन होते आणि आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ङ्गसंपादकांनी घेतलेली स्वयंदीक्षा म्हणजे पत्रकारिता होयङ्ग असे म्हटले आहे. वृत्तपत्रे किंवा पत्रकारिता म्हणजे वर्तमानाची व्याख्या करणारी आणि भविष्य घडविणारी एक घटना आहे.

वृत्तपत्रामुळे समाजातील निर्भयता, स्पष्टपणा आणि स्वातंत्र्याचा उदय होतो. मानवी समाज वृत्तपत्रातील घटना, लेख-अग्रलेख वाचून प्रभावित होतो. अर्थातच त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, त्याप्रमाणे संपादकाला स्वयंदीक्षा घ्यावी लागते. कारण संपादकाच्या बौद्धिक, सामाजिक, जागृती आणि जाणीवेवरच हे सगळं अवलंबून असते. वृत्तपत्रांच्या कार्यानुसार आणि पत्रकाराच्या ध्येयानुसार पत्रकारितेला विविध भागात विभागीत करण्यात आले आहे. त्यात 'अ‍ॅडव्होकेसी जर्नालिझम' म्हणजे जनसमर्थन पत्रकारिता ही महत्त्वाची पत्रकारिता आहे.

'अ‍ॅडव्होकेसी जर्नालिझम' मध्ये पत्रकार एखाद्या विषयावर ठाम भूमिका घेतात आणि त्यांच्या लिखाणाने वाचक किंवा प्रेक्षकांना त्यांचा दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करतात. सामाजिक प्रश्न वा समस्या सोडवणुकीसाठी न्याय मिळवून देईपर्यंत सातत्यपूर्ण केलेली पत्रकारिता म्हणजे 'अ‍ॅडव्होकेसी जर्नालिझम' जनसमर्थन पत्रकारिता होय. या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता, भारताला राष्ट्र म्हणून उभे राहायचं असेल, जगायचे असेल, तर सर्वप्रथम भारतातल्या प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी प्राप्त करून द्यावी लागेल. हा ऐतिहासिक महामंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेने जगाला दिलेला आहे. माणूसपणाच्या भोवती असलेली विषबंदी, तिचा त्याग करण्याचा संकल्प प्रत्येक भारतीयांनी करून राष्ट्रभक्ती, राष्ट्रशक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्राच्या ऐक्याचा संकल्प करावा, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच पत्रकारितेचे उद्दिष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचा दृष्टिकोन स्वीकारून तत्कालीन स्पृश्य-अस्पृश्य समाज, राजकीय नेते, त्यांचे राजकीय विचार प्रवाह आणि ब्रिटिश सरकार यांच्या परस्पर वैचारिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, द्वन्दाची अधिक सटीक पद्धतीने मांडणी करून समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वलिखित अग्रलेखातील विविध पैलू हे समकालीन इतर पत्रकारांच्या पेक्षा भिन्न आहेत. त्यांची दृष्टी, विषय मांडणी, दूरदृष्टीची परिणामकारकता भेदक आणि मार्मिक आहे. त्यांचे लेखन बहुआयामी बहुविषयी स्पर्शित आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जनसमर्थन पत्रकारितेने माणूस घडविण्याच्या आणि एक नवीन भारत निर्मितीच्या महान क्रांतिकारी कार्यात अमूल्य योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा विचार करता १९२० ला त्यांनी 'मूकनायक' द्वारे मुक्यांना बोलके केले, तर 'बहिष्कृत भारत' ने बहिष्कृत समाजाला प्रबोधित करून अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी तयार केले. याच बहिष्कृत भारतातील जनतेला त्यांच्या 'जनता' ने अधिकारांची आणि न्याय हक्काची जाणीव करून दिली. या देशातील मुक असलेल्या माणसाची प्रगती अशा पद्धतीने करत, माणसाला प्रबुद्ध नागरिक आणि देशाला प्रबुद्ध भारत बनविण्याचे महान कार्य 'प्रबुद्ध भारता'तून त्यांनी केले आहे. त्यामुळेच एक नवा इतिहास घडला. असे कार्य त्यांच्या जनसमर्थन पत्रकारितेमुळे घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे उद्दिष्ट समाज परिवर्तन, समाज सुधारणा करणे, हे असल्यामुळे त्यांनी लोकप्रबोधन आणि लोक शिक्षण, सामाजिक जाणिवेच्या अनुषंगाने आपल्या अग्रलेखांचे लेखन केले आहे. त्या विषयाच्या मांडणीमध्ये त्यांचे सामाजिक परिवर्तन हेच ध्येय आहे. एकूण समग्र परिवर्तन आणि मानवी कल्याणाचे ध्येय हस्तगत करण्यासाठीच त्यांनी अग्रलेखाचे लेखन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला एकसंघ ठेवण्यासाठी महान राज्यघटना देऊन, एक स्वयंपूर्ण लोकशाही लोकराज्य म्हणून निर्माण केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते जनसंपर्क पत्रकारितेचे जनक ठरतात.

– प्रा. संजय घरडे

# राहुल सांकृत्यायन: बौद्ध त्रिपिटकाचार्य!

**(९-१४ एप्रिल:राहुल सांकृत्यायन जयंती व स्मृतिदिन विशेष.)**

**असामान्य पांडित्यामुळे राहुलजींना महापंडित, महामानव, तसेच बौद्ध ग्रंथाच्या सखोल अध्ययनामुळे त्रिपिटकाचार्य अशी गौरवपूर्ण अभिधाने बहाल केली गेली. बौद्ध देशांतून तसेच रशिया आदी देशांतून त्यांना खुप मानसन्मान लाभले. भारतातही त्यांना सन्मान्य डॉक्टरेट आणि साहित्य अकादमी पुरस्कार दिला गेला. भारत सरकारने पद्मभूषण देऊन त्यांना गौरविले. अधिक जाणून घ्या श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींच्या या लेखाद्वारे.**

राहुल सांकृत्यायन इराणमार्गे सन १९३७मध्ये रशियात गेले. ही त्यांची रशियाची दुसरी यात्रा होती. यावेळी लेनिनग्राड येथील ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये ते प्राध्यापक म्हणून गेले. या संस्थेच्या सचिव एलेना होत्या. एलेना- लोला याच पुढे त्यांच्या पत्नी झाल्या. त्यांना पुन्हा एकदा तिबेटात जायचे होते. म्हणून ते लवकरच भारतात परतले व त्यांनी तिबेटचा प्रवास केला. नंतर त्यांनी भारताच्या गरीब जनतेची सेवा करणे व किसान मजदूर राज्य भारतात आणणे यासाठी राजकाणात सक्रीय भाग घेतला. परिणामी ते एकूण अडीच वर्षे तुरुंगात होते. तुरुंगात त्यांनी लेखन करून हिंदी साहित्यात मोलाची भर घातली. वोल्गा से गंगा हा तुरुंगात लिहिलेल्या त्यांच्या नितांतसुंदर हिंदी कथांचा संग्रह आहे. भारतीय व परदेशी अशा १५ भाषांत या कथा अनुवादित झाल्या आहेत. पुन्हा त्यांना रशियाचे निमंत्रण आले. त्यानुसार सुमारे दोन वर्षे रशियात राहून ते भारतात परतले. सन १९४९मध्ये हैदराबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना बहाल करून त्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी त्यांच्या खाजगी सचिव नेपाळी महिला कमला त्यांच्या सोबत होत्या. पुढे त्याही त्यांच्या पत्नीच झाल्या. एलेनापासून त्यांना इगोर राहुलोविच तर कमलापासून जया व जेता ही संतती झाली.

लहानपणापासूनच त्यांनी सातत्याने विपुल लेखन केले. हिंदी- मेरी लद्दाख यात्रा, तिब्बतमे सवा वर्ष, मेरी यूरोप यात्रा, जापान आदी प्रवासवर्णने त्यांनी लिहिली. हिंदी कथा, कादंबरी क्षेत्रातही त्यांनी मोलाची भर घातली. कथा- सतमी के बच्चे, बहुरंगी मधुपुरी, कनैलाकी कथा इत्यादी. कादंबऱ्या- जीने के लिए, जय योधेय, विस्मृत यात्री इ. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जीवनाचे दर्शन घडते. केवळ प्राचीन परंपरेला न अनुसरता इतिहास संशोधनाच्या वृत्तीने त्यांनी आपल्या पात्रांचे जीवनचरित्र, सामाजिक परिस्थिती इत्यादींचे चित्रण केले. संस्कृत-प्राकृतादी प्राचीन भाषांतील ग्रंथ त्यांनी हिंदीत भाषांतरित करून हिंदी भाषेला अधिक संपन्न केले. त्यांच्या ग्रंथाची एकूण संख्या १५० वर भरते. धर्म, तत्त्वज्ञान, राजनीती, इतिहास, पुरातत्त्व, समाजशास्त्र, प्राच्यविद्या, व्याकरण, संस्कृती, भाषा-साहित्य, कोश, विज्ञान, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, कथा-कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, देशदर्शन इत्यादी विषयांवर व प्रकारांत त्यांनी दर्जेदार लेखन केले. हिंदीशिवाय त्यांनी संस्कृत, अपभ्रंश व तिबेटितही ग्रंथ लिहिले व अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथ उत्तम प्रकारे संपादून प्रकाशात आणले. त्यांच्या लेखनाचा आणि विद्वत्तेचा आवाका फार विशाल असल्याचे त्यांच्या प्रकाशित ग्रंथांच्या यादीवर सहज नजर टाकली, तरी लक्षात येईल.

राहुल सांकृत्यायन हे जागतिक कीर्तीचे भारतीय महापंडित व लेखक होते. त्यांचा जन्म उत्तर प्रदेशात कनैला, जि. आझमगढ या गावी दि.९ एप्रिल १८९३ रोजी एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ व कुलनाम पांडे होते. माता पिता कुलवंती व गोवर्धन होत. बौद्ध धम्माची दिक्षा घेतल्यानंतर केदारनाथांनी राहुल हे नाव धारण केले व सांकृत्य हे त्यांचे गोत्र असल्याने ते राहुल सांकृत्यायन या नावाने प्रख्यात झाले. वयाच्या पंधराव्या वर्षी उर्दू मिडल स्कूल परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते घरातून पळून गेले. वयाच्या अकराव्या वर्षीच त्यांचा विवाह झाला होता, पण हा अजाणतेपणी झालेला विवाह म्हणून त्यांनी त्याचे बंधन मानले नाही. अठराव्या वर्षी ते वाराणसीला गेले व तेथे त्यांनी संस्कृत आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले. त्यांना केवळ विद्वत्ता नको होती, तर साधू व्हायचे होते. त्यांची विरक्त वृत्ती पाहून छप्रा गावच्या एका महंताने त्यांना वैष्णव धर्माची दीक्षा दिली. त्यांचे पंथीय नाव रामोदार साधू असे ठेवले. काही काळ तेथील मठपती म्हणूनही त्यांनी काम पाहिले. नंतर ते छाप्रा गाव सोडून दक्षिण भारताच्या तीर्थयात्रेस गेले.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

त्यांनी सबंध भारताचा प्रवास केला. त्यांच्या वृत्तीत स्वतःस झोकून देण्याची उत्कटता होती. एकदा मनाने घेतलेल्या गोष्टींकडे ते उत्कटपणे धाव घेत व तिचा संपूर्ण व सखोल वेध घेत. दक्षिण भारताची तीर्थयात्रा सोडून ते अयोध्येस आले व त्यांनी संस्कृत पाठशाळेत वेदांताचा सखोल अभ्यास केला. अयोध्येतच ते आर्यसमाजाकडे आकृष्ट झाले व त्यांनी दयानंदांच्या सत्यार्थ प्रकाशाचे सखोल अध्ययन केले. आर्यसमाजाच्या विचारांचा त्यांच्यावर खुपच प्रभाव पडला. अयोध्येहून ते आग्र्यास गेले व तेथील आर्यसमाजाच्या विद्यालयात दाखल झाले. ख्रिस्ती व इस्लाम धर्मीय आपल्या धर्मप्रसारासाठी आटोकाट प्रयत्नच करतात व हिंदूंवर आघात करतात, म्हणून त्यांनी विरक्त, विद्वान व संघटनाकुशल अशा हिंदू तरूणांची मिशनरी त्यागीवृत्तीने काम करणारी संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. रशियात सन १९१७मध्ये झालेल्या क्रांतीने ते प्रभावित झाले आणि क्रांतीकडे व साम्यवादाकडे आकृष्ट झाले. त्यांनी साम्यवादी तत्त्वज्ञान सखोलपणे अभ्यासले. बाइसवी सदी हा त्यांचा ग्रंथ याचेच फलित होय. मार्क्सवादावर त्यांनी बरेच लेखन करून त्याचा प्रचारही केला. साम्यवाद ही क्यो?सोविएत न्याय, मानव समाज, आजकी समस्याएँ, आजकी राजनीति आदी त्यांचे राजनीतीवरील उल्लेखनीय ग्रंथ होत. नंतर ते बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाले. त्यांनी पाली भाषा-साहित्याचे व बौद्ध धर्म-तत्त्वज्ञानाचे सखोल अध्ययन केले. लखनौ येथील बोधानंद भिक्षू यांच्याशी परिचय झाल्यावर त्यांनी त्यांच्यासमवेत अनेक बौद्ध तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. त्यांना यात्रेत परदेशी भिक्षूही भेटले. भारताबाहेरही बौद्ध धर्माचा प्रसार बराच आहे, असे समजल्यावर त्यांनी त्या त्या देशांच्या भाषा व लिपी यांचा अभ्यास केला. उर्दू, हिंदी, संस्कृत प्राकृत, पाली,अपभ्रंश, इंग्रजी, अरबी, फार्सी, फ्रेंच, तमिळ, कन्नड, चिनी, तिबेटी, जपानी, रशियन, आदी भाषांवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते.

बौद्ध धम्माकडे ते अधिकाधिक आकृष्ट झाले आणि त्यांनी सन १९३० साली श्रीलंकेत जाऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. साम्यवाद व बौद्ध धम्मतत्त्वज्ञान या दोहोंच्या समन्वयाने त्यांचे विचार समतोल व अधिक तेजस्वी बनले. सनातन धर्माकडून आर्यसमाजाकडे तेथून साम्यवादाकडे तेथून बौद्ध धम्माकडे व शेवटी मानव धर्माकडे असा त्यांच्या वैचारिक प्रवास झाला. मध्यंतरी सन १९२१मध्ये त्यांनी गांधीजींच्या हाकेस प्रतिसाद देऊन स्वातंत्र्याच्या आंदोलनात उडी घेतली. तिथून सहा महिने आणि सन १९२५ पर्यंत दोन वर्षे त्यांनी तुरुंगवासही भोगला. तुरुंगात त्यांचा व्यासंग व लेखन सुरूच होते. नंतर दोन वर्षांनी ते बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी संस्कृतचे अध्यापक म्हणून श्रीलंकेत गेले. नंतर ते अधिक सखोल अध्ययनासाठी नेपाळमार्गे तिबेटात ल्हासा येथे गेले. तिबेटमधून ते सन १९३०साली पुन्हा श्रीलंकेत गेले. नंतर बौद्ध धर्मप्रचारासाठी ते दोन वर्षांत लंडन येथे व तेथून यूरोपात गेले. यूरोपात ते सुमारे तीन महिने होते. सन १९३३मध्ये ते पुन्हा युरोपातून श्रीलंकेत गेले व तेथून भारतात परतले. तेथून पुन्हा दुसऱ्यांदा जमू-काश्मीरमार्गे लडाख येथे गेले. या प्रवासात त्यांनी सुत्तपिटकातील प्रख्यात ग्रंथ मज्झिमनिकायचा हिंदीत अनुवाद केला. नंतर त्यांनी पुढे धम्मपद, विनयपिटक, दीघनिकाय यांचे हिंदीत अनुवाद केले. तसेच आनंदकौशल्यायन व जगदीश काश्यप यांच्या सहकार्याने खुद्दकनिकायचे अकरा ग्रंथ देवनागरीत आणले. तसेच त्यांनी बुद्धचर्या आणि महामानव बुद्ध हे बुध्दाचे चरित्र असलेले ग्रंथ हिंदीत लिहिले.

बिहारात १९३४मध्ये मोठा भूकंप झाला. तेव्हा भूकंप ग्रस्तांच्या सेवेसाठी ते बिहारमध्ये राहिले. नंतर ते पुन्हा सिक्कीममार्गे तिबेटात ल्हासा येथे गेले. तिबेटमध्ये जाण्याचा त्यांचा हेतू भारतात उपलब्ध नसलेल्या संस्कृत ग्रंथाचा शोध घेणे, हा होता. हे ग्रंथ मूळ वा अनुवाद रूपात तिबेटमध्ये उपलब्ध असावेत, अशी त्यांची धारणा होती. नंतर ते पूर्वेकडील बौद्ध धर्मीय देशांत- ब्रह्मदेश, थायलंड, जपान, कोरिया येथे गेले. सन १९३५ मध्ये ते जपानला पोहोचले. या यात्रेवरून परतल्यावर ते परत नेपाळमार्गे तिबेटात गेले. या तिबेट यात्रेत त्यांना अनेक अत्यंत महत्त्वाचे प्राचीन ग्रंथ मिळाले व ते त्यांनी भारतात आणले. त्यांनी तिबेटी ग्रंथ कंजूर- मूळ बुद्धवचनांचे अनुवादग्रंथ, संख्या १,१०८; तंजूर- अनुवादित भाष्यग्रंथ; संख्या ३,४५८आहे. तसेच अनेक संस्कृत हस्तलिखितांच्या छायाप्रती वा नकला करून आणल्या. हा महत्त्वपूर्ण प्राचीन ग्रंथसंभार पाटणा येथील बिहार रिसर्च सोसायटी व के.पी. जयस्वाल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयांत जतन करून ठेवला आहे. त्यांनी तिबेटातील मठांतून भारतातून नष्ट झालेल्या प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या आणलेल्या छायाप्रतींत वसुबंधुकृत अभिधर्मकोश-भाष्य, अभिधर्मदीप महासांधिकांचे प्रतिमोक्षसूत्र, अर्थविनिश्चयसूत्र टीकेसहीत दुर्वेकृत धर्मोत्तर प्रदीप, प्रमाणवार्तिक भाष्य, योगाचारभूमी, विनयसूत्र व त्यावरील वृत्ती आणि टीका वगैरेंचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

मसूरी येथील वास्तव्यात त्यांनी मध्य एशियाका इतिहास- २ भाग, तसेच 'हिमालय परिचय' योजनेच्या अंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. सन १९५४मध्ये त्यांनी कार्ल मार्क्स, लेनिन, स्तालिन आणि माओत्सेतुंग यांची चरित्रे लिहिली. मेरी जीवनयात्रा हे त्यांचे आत्मचरित्र होय. ते विमानाने चीनला गेले. तेथे ते साडेचार महिने होते. भारतात परतल्यावर श्रीलंकेच्या निमंत्रणावरून विद्यालंकार विद्यापीठात ते तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून १९५९ मध्ये गेले. शेवटी प्रकृत्ती बरी नसल्याने ते भारतात परतले. त्यांना स्मृतीभ्रंश जडला व नंतर त्यातच दार्जिलिंग येथे त्यांचे दि.१४ एप्रिल १९६३ रोजी निधन झाले.

!! त्यांच्या अचाट साहित्यकृतीला जयंती व पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन !!

# शासकीय कर्करोग रुग्णालयात पेट स्कॅनची व्यवस्था करून ५० कोटींच्या निधीसह विविध योजनांचा लाभ द्या- डॉ. राजेंद्र दाते पाटील यांची मागणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर येथे पेट स्कॅनची व्यवस्था करून ती आंमलात येई पर्यंत शासनाच्या विविध योजनेतून ही सेवा गोर गरीब रुग्णांना मोफत उपलब्ध करणे व पेट स्कॅन कार्यान्वित करण्या साठी किमान ५० कोटीं निधीची उपलब्धता होण्याचे आदेश द्यावेत अशी महत्वाची मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री यांचें कडे केली असता जन आरोग्य विभागाचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य यांचे कडे योग्य ते आदेश देउन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन पाठवले आहे.



**मुख्यमंत्री यांचे आदेश जारी!**

या बाबत सविस्तर निवेदन असे आहे की, पेट स्कॅन साठी गोरगरीब रुग्ण, शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे येतात वास्तविक पहाता जवळ पास संपुर्ण महाराष्ट्रात या अत्यावश्यक सेवेचा अभाव असल्यामुळें रुग्ण मृत्युशी झुंज देत आहेत. शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णाच्या पेट स्कॅन इलाज करावयाचे असेल तर या रुग्णालयात ही सुविधा नाही, हे पेट स्कॅन खाजगी रुग्णालया तुन करून आणा असे सर्रास रुग्णालया तुन सांगीतले जात असल्यामुळे गोर गरीब रुग्ण हवाल दिल झाले असल्याची महत्वाची बाब पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निदर्शनास आणून दिली असता वरील प्रमाणे आदेश झाले आहेत.

सदरचे पेट स्कॅन बाहेरून तपासणी करून आणण्यासाठी गोरगरीब रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांचें कडे पैसेच नसल्याने रुग्ण व रुग्णाचें नातेवाईक चिंताक्रांत झालेले आहेत. ही बाब फक्त एखाद्याच रुग्णाची नसून बहूसंख्य रुग्णावर ही वेळ तथा आफात आलेली आहे. कॅन्सरचे शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे पेट स्कॅनची वाट पहावी लागणार असुन कर्करोग रुग्णालयात पेट स्कॅनची प्रतीक्षाच करावी लागत आहे.याला कारण म्हणजे सध्या शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर येथे या आधुनिक उपचार पद्धतीसाठी त्यासाठी आवश्यक असे न्युक्लिअर मेडिसिन तज्ज्ञ, तंत्रज्ञ, तपासणीसाठी लागणाऱ्या सर्व सेवासुविधा उपलब्ध नाहीत ज्या की उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे असेही पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी नमूद केले होते.

सदरचे पेट स्कॅनची पद्धत ही कॅन्सरची स्टेज ओळखण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण मदत करते जेणे करुन अनेक रूग्ण मरणाच्या दारातून बाहेर पडतात तसेच पेट स्कॅन द्वारे कॅन्सर कोणत्या स्टेजवर आहे याचे निदान करण्यास व आवश्यक ते उपचार करण्यास महत्वाची मदत होते व ते कळण्यास मदत होते आणि त्यामुळे आवश्यक तो पुढील उपचार झाल्या नंतरही कॅन्सर किती बरा झाला, उपचाराला कसा प्रतिसाद मिळत आहे, हे देखील या तपासणीतून कळते. कॅन्सर रुग्णांना किमान एक ते चार वेळा ही तपासणी करावी लागते असे नमुद करून त्यांनी आपल्या निवेदनात हेही नमुद केले की, या सर्व सेवा सुविधा सद्य स्थितीत उपलब्ध नसल्या मुळे रुग्ण जगण्याचा लढा देत आहेत.या महत्वाच्या अशा पेट स्कॅन साठी खासगी रुग्णालयात हजारो रुपये अदा करावे लागतात. शासकीय कर्करोग रुग्णालयात येणारे रुग्ण हे गोरगरीब असतात,शासकीय कर्करोग रुग्णालयाची सुसज्ज इमारत उपलब्ध असली तरी पेट स्कॅन ची सोय नसल्यामुळे रुग्णांच्या जिविताशी खेळ होत आहे. म्हणून पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी शासकीय कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजी नगर येथे पेट स्कॅन मशिन व तंत्रज्ञान येऊन ती सुरू होई पर्यंत किमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत या तपासणीचा अती तात्काळ समावेश करून गोरगरीब कॅन्सर रुग्णांना आधार देऊन त्यांचा जीव वाचवावा,कर्करोग रुग्णालयात उपचार घेण्यासाठी सदरची पेट स्कॅन प्रकिया ही अनिवार्य बाब आहे. साधारणतः २० हजार रुपयांच्या आसपास खासगी रुग्णालयात पेट स्कॅन तपासणी साठी मोजावे लागतात.गोर गरीब रुग्णांना ही रक्कम अजिबात परवडणारी नसल्यामुळे आणि पेट स्कॅन किमान ४ ते ५ वेळेस करणे आवश्यक असते म्हणून पेट स्कॅनची प्रतीक्षाच करावी लागत आहे.पेट स्कॅन कार्यान्वित करण्या साठी व इतर सेवा सुविधा साठी किमान ५० कोटीं निधीची आवश्यकता आहे. रुग्णांच्या जीविताची काळजी घेण्यासाठी तात्काळ कार्यवाही होण्याचे आदेश आरोग्य व अर्थ विभागास व्हावेत अशी जोरकस मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्मंत्र्यांकडे केलीअसता त्यांनी वरील प्रमाणे आदेश दिले आहेत.

## ‘सामाजिक समता सप्ताह’ विविध उपक्रमांनी साजरा करणार - सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंतीनिमित्त ८ ते १४ एप्रिल २०२५ दरम्यान ‘सामाजिक समता सप्ताह’ साजरा केला जाणार आहे. यानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये सर्व समाजघटकांनी सहभाग घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार यांनी केले आहे.

समता पर्व सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर सर्व शासकीय वसतिगृह, सर्व दिव्यांग शाळा व समाज कल्याण विभागांर्तगत येणाऱ्या सर्व कार्यालयांमध्ये व्याख्यान, रक्तदान शिबिर, विविध उपक्रमांच्या अनुषंगाने कार्यशाळा, विविध प्रबोधनपर कार्यक्रम, ज्येष्ठ नागरिक व महिला मेळावा आदी उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यात सहभाग घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

सामाजिक समता सप्ताहात हे उपक्रम राबविले जाणार

दि. ९ एप्रिल, २०२५ रोजी विभागातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन.

दि. १० एप्रिल, २०२५ रोजी मुंबई शहर जिल्ह्यामध्ये पथनाट्य व लघुनाटिका या द्वारे सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत जनतेचे प्रबोधन.

दि. ११ एप्रिल, २०२५ रोजी क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात येणार.

दि. १२ एप्रिल, २०२५ संविधान जागर भारतीय संविधानाविषयी सर्वसाधारण माहिती देण्यात येत आहे तसेच संविधानाची निर्मिती, संविधान निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषतः मुलभूत अधिकार व मुलभूत कर्तव्ये याविषयी व्याख्यान.

दि. १३ एप्रिल, २०२५ रोजी प्रत्येक जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबिर व ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात येत असून, जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने विभागातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या साहाय्याने जिल्ह्यातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी व अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार .

दि. १४ एप्रिल, २०२५ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन व इतर कार्यक्रम, व्याख्याने, चर्चासत्र इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी विभागातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात ऑनलाईन जातपडताळणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत.

## मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत औद्योगिक वापरासाठीचे चार बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यातील घरगुती व औद्योगिक पातळीवर पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, बिगर सिंचन पाणी आरक्षणासाठी सादर करण्यात आलेल्या चार प्रस्तावांबाबत आजच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे आदि उपस्थित होते. प्रचलित क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेनुसार - पिण्याच्या पाण्यासाठी १५ टक्के व औद्योगिक वापरासाठी १० टक्के - या मर्यादे अंतर्गत असलेल्या आरक्षण प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार पाटबंधारे विकास महामंडळास देण्यात आले आहेत. त्या मर्यादे पलीकडील प्रस्तावांना या मंत्रिमंडळ उपसमिती समोर मांडून त्यांना मान्यता देण्यात येते. आजच्या बैठकीत मंत्रिमंडळ उपसमितीने खालील तीन प्रस्तावांना मान्यता दिली आहे.

मे. मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., हैद्राबाद - पाचोरा, जळगाव, मे. मेघा इंजिनिअरिंग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., हैद्राबाद - नवापूर, नंदूरबार आणि मे. रॉकिंग बॉम्बे ब्रेवरेज - मौजे खानाव, ता. खालापूर, जि. रायगड. त्या व्यतिरिक्त चौथ्या - म्हणजे एनटीपीसी च्या प्रस्तावाच्या बाबतीत सर्वानुमते असे मान्य झाले की, कुंभे जलविद्युत प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक निधी एनटीपीसीने त्यांना आवश्यक पाणी वापराच्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याबाबत एनटीपीसीला विचारणा करावी व शासनाच्या प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही स्वतंत्रपणे करावी.

# संगीत रंगभूमीचे वैभव: अशोक परांजपे

## (अशोक परांजपे पुण्यस्मरण विशेष)

अशोक गणेश परांजपे हे पट्टीचे मराठी गीतकार होते. ते मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोककला संचालनालयाचे संचालक होते. त्यानंतर ते औरंगाबादला स्थायिक झाले होते. त्यांनी भक्तिगीत, भावगीत, अंगाईगीत, लावणी, गण-गवळण आणि नाट्यगीत या प्रकारची गीते लिहिली. इंडियन नॅशनल थिएटर- आयएनटी रिसर्च सेंटरचे त्यांचे काम सुरू असताना त्यांनी महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील लोक कलावंतांच्या लोककलेच्या ध्वनिफिती तयार केल्या. त्या संदर्भात परांजपेंनी सन १९९२मध्ये पंढरपूर भक्तिसंगीत महोत्सव आणि १९८६मध्ये आनंदवन येथील महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव, असे दोन महोत्सव आयोजित केले. या कामाची नोंद फोर्ड फाउंडेशनने घेतली. ऑस्ट्रियातील इन्स्टिट्यूट ऑफ व्हिडिओग्राफी- आयओव्ही या आंतरराष्ट्रीय लोककला संस्थेने त्यांना सभासदत्व दिले. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी कलावंतांना फ्रान्स, आयर्लंड, जपान आदी देशांत नेऊन तेथे त्यांना कला सादर करण्याची संधी मिळवून दिली.

अशोक गणेश परांजपे हे महाराष्ट्रातील लोककला संशोधक, गीतकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० मार्च १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे झाला. त्यांचे वडील गणेश परांजपे हे आयुर्वेदाचार्य होते. हरिपूर ही भूमी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या नावाने ओळखली जाते. त्यांचे ग्रामसंस्कृतीशी अतूट नाते होते. शालेय जीवनापासूनच त्यांना सांगली परिसरातील लोककलांचे विलक्षण आकर्षण वाटू लागले. शाहीर आनंदराव सूर्यवंशी, शाहीर बापूराव विभूते, तमाशा कलावंत शंकर तात्या सावजळकर, काळू-बाळू अशा लोककलावंतांशी त्यांचा सततचा संपर्क होता. शाहिरी, सोंगी भारुड दत्तपंथी भजन, तमाशा, तलवार, दांडपट्टा, करपल्लवी या लोककला सांगली परिसरात लोकप्रिय होत्या. त्या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखन, वाचन, चित्रकारी सोबतच कुस्तीची त्यांना आवड होती. मुंबईत आल्यावर जे.जे.स्कुल ऑफ आर्टमध्ये त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले.

दि.१० ऑक्टोबर १९७८ रोजी इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्राची स्थापना वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या हस्ते झाली. या संशोधन केंद्राचे संचालक म्हणून अशोकजींनी जबाबदारी स्वीकारली. तसेच ही जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पारही पाडली. सन १९८६ साली इंडियन नॅशनल थिएटर लोक प्रयोज्य कला संशोधन केंद्रातर्फे आनंदवन वरोरा येथे आदिवासी महोत्सवाचे आयोजन त्यांच्या संकल्पनेतून झाले होते.

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी या आदिवासी महोत्सवाचे मार्गदर्शक होते. दामू झवेरी, कपिला वात्सायन, दुर्गा भागवत आदी मान्यवर या महोत्सवाला उपस्थित होते. सन १९९२मध्ये पंढरपूर येथे भक्तीसंगीत महोत्सवाचे आयोजन त्यांच्याच संयोजनाने झाले होते. फ्रान्स, आयलंड, जपान आदी देशांत महाराष्ट्रातील लोककलांची पथके नेवून तेथे मार्गदर्शन केले. खंडोबाचे जागरण, देवीचा गोंधळ, कोकणातील दशावतार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या कला, पारंपरिक तमाशा, कीर्तन, लळीत अशा लोककलांच्या जतन, संवर्धन आणि संशोधनासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयएनटीच्या लोक प्रायोज्य कलेच्या संशोधन विभागाचे संचालक असताना कार्य केले. आयएनटीतर्फे ग्रामीण भागातील लोककला आणि लोककलावंतांना नागर रंगमंच उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. तमाशा अभ्यासक रुस्तुम अचलखांब, शाहीर बापूराव विभूते, गोंधळमहर्षी राजारामबापू कदम, चित्रकथी बाहुलेकार गणपत मसगे, परशुराम गंगावणे, पारंपरिक वाद्ये शंकरराव जाधव धामणीकर, दशावतारी कलावंत बाबी नालंग अशा अनेक लोककलावंतांचे कार्यक्रम त्यांनी मुंबईत छबिलदास सभागृहात आयोजित केले. त्यानिमित्त त्या लोककला प्रकारांवर माहितीपूर्ण पुस्तिका प्रसिद्ध केल्या. खंडोबाचे जागरण, लळीत, दशावतार, वासुदेवांची गाणी, नमन खेळे, मादळ यांसारख्या आदिवासी कला यावर अभ्यासपूर्ण पुस्तिका त्यांच्या संकल्पनेतून आयएनटीने प्रसिद्ध केल्या. खंडोबाचं लगीन, दशावतारी राजा, जांभूळाख्यान, वासुदेव सांगती, अरे रे संसार, मातीचं स्वप्न अशा आयएनटी संशोधन केंद्राच्या संशोधन नाट्यांची मूळ संकल्पना आणि लेखन मार्गदर्शन परांजपे यांचे होते. महाराष्ट्रात लोककलांच्या संशोधनाची नवी परंपरा निर्माण करून तरुण अभ्यासकांची फळी महाराष्ट्रभर उभी करण्याचे श्रेय त्यांना जाते. प्रकाश खांडगे, तुलसी बेहेरे, रमेश कुबल, गणेश हाके, सुरेश चव्हाण, पंढरीनाथ काळे, सुरेश चिखले, रामचंद्र वरक अशा तरुण अभ्यासकांची फळी त्यांनी निर्माण केली. त्यांना त्यांचा अभ्यास विषय असलेल्या लोककलांमध्ये मार्गदर्शन केले.

अशोकजी परांजपे यांचे मराठी रंगभूमिवरील योगदान नाटककार म्हणून उल्लेखनीय आहे. संत कान्होपात्रा, संत गोरा कुंभार, अबक दुबक, बुद्ध इथे हरला आहे, आतून कीर्तन वरून तमाशा, दार उघड बया सारखी संगीत रंगभूमीचे वैभव वाढविणारी नाटके त्यांनी लिहिली. नाटकांसोबतच वर्तमानपत्रात त्यांनी स्तंभ लेखन केले. अनोळखी पाऊले ही त्यांची स्तंभलेखन मालिका अतिशय प्रसिद्ध होती. लोककलांचे संशोधन, नाट्यलेखन या सोबतच ते गीतकार म्हणूनही लोकप्रिय होते.

अवघे गर्जे पंढरपूर, आला आला सुगंध मातीचा, एकदाच यावे सखया, कुणी निंदावे वा वंदावे, केतकीच्या बनी तिथे, दारी उभी अशी मी, दीनांचा कैवारी, नाम आहे आदी अंती, नाविका रे, पाखरा जा दूर देशी, पैलतीरी रानामाजी, वाट इथे स्वप्नातील संपली जणू, आला आला सुगंध मातीचा अशी अनेक लोकप्रिय गीते त्यांनी लिहिली. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. लोककला संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. अशोकजी परांजपेंनी दि.९ एप्रिल २००९ रोजी त्यांच्या औरंगाबाद येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली.

!! त्यांच्या अविस्मरणीय अनेक स्मृतींना विनम्र अभिवादन !!


- संकलन व शब्दांकन -
**श्री. एन. कृष्णकुमार,**
से.नि.अध्यापक.
मु. पिसेवडधा, ता. आरमोरी.
जि. गडचिरोली,
मोबा. नं. ७७७५०४१०८६.


## पत्रकारांचे आयुष्य सुकर करण्यासाठी शासनाचे सातत्यपूर्ण काम - मुख्यमंत्री

### टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशन पुरकार वितरण सोहळा

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पत्रकारांना बातम्या मिळिवताना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. पहिली बातमी आपली असावी, या स्पर्धेमुळे पत्रकारांची बातमी मिळिवण्याची धडपड अनेकवेळा निदर्शनास येते. पत्रकार कुटुंबासाठी वेळ न देता आपल्या करिअरला वाहून घेत आपल्या कर्तव्याला न्याय देतात. पत्रकारांचे हे धडपडणारे आयुष्य सुकर करण्यासाठी शासन सातत्यपूर्ण काम करीत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

अण्णाभाऊ साठे सभागृहात टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशनच्यावतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार प्रसाद लाड, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, टिव्ही जर्नलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष उदय जाधव, महासचिव पंकज दळवी, खजिनदार प्रवीण पाटील उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रामध्ये महिला पत्रकारांचे विशेषत्वाने कौतुक करावेसे वाटते. बातमी मिळिवताना त्यांना मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागतो. बऱ्याच ठिकाणी कुठलेही मूलभूत सुविधा नसतानाही महिला पत्रकार आपले काम अचूकतेने बजावीत असतात. पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन कटीबद्ध असून पत्रकारांना सोबत घेऊन ते सोडवण्याबाबत सकारात्मक कार्यवाही केली जाईल.

टीव्ही जन्मालिस्ट असोसिएशनचा हा पहिलाच पुरस्कार सोहळा असल्याचे सांगत या सोहळ्याला उपस्थित राहता आले, याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या पुरस्कार सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार देण्यात आले. पत्रकारिता क्षेत्राला दिलेल्या योगदानाबद्दल हा त्यांचा गौरव होता. पुरस्कार हा आपल्या क्षेत्रातील कामाचे मूल्यमापन असते. त्यामुळे असोसिएशन सुरू केलेले पुरस्कार कौतुकास्पद आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

पुरस्कार सोहळ्यात उत्कृष्ट पत्रकार, कॅमेरामॅन, वृत्त निवेदक, ग्रामीण भागातील पत्रकार, कॅमेरामॅन, जीवनगौरव पुरस्कार आदींचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला बहुसंख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ वी सर्वपक्षीय जयंती उत्सव समिती छत्रपती संभाजीनगरतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्साहात साजरी करण्यात येत असून यावर्षी समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. गेल्या ४० वर्षांपासून समिती विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे, आणि यावर्षी सर्वपक्ष व संघटनांच्या सहकार्याने हे कार्यक्रम साजरे होणार आहेत. सरदार नवीन ओबेरॉय यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून अगोदरच निवड करण्यात आली आहे. दानशूर व्यक्ती म्हणून त्यांची जनमानसात ख्याती आहे.

११ एप्रिल २०२५: समितीच्या वतीने कार्यालयात सर्वरोगनिदान शिबीर आयोजित केले जाणार असून, त्यानंतर आढळलेल्या रुग्णांवर विनामूल्य ऑपरेशन करण्यात येईल.

४. १२ एप्रिल २०२५: उस्मानपुरा येथे सायं. ७ वाजता भिम रजनीचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर भोजनदान होईल.

५. १३ एप्रिल २०२५: रात्री १२ वाजता भडकलगेट येथे फटाक्यांची आतिशबाजी आणि केक कापून आनंदोत्सव साजरा केला जाईल.

६. १४ एप्रिल २०२५: भडकलगेट येथे डॉ. आंबेडकर पुतळ्यासमोर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात येईल. या सभेला बहुजन विकास व दुग्धविकास मंत्री अतुल सावे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार प्रदीप जैस्वाल, पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार यांचा सहभाग असणार आहे.

मिरवणूक:

१४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता क्रांती चौक येथून मिरवणूक सुरू होईल, ज्याला पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार यांच्या हस्तेझेंडा दाखवून प्रारंभ केला जाईल. मिरवणूक शांततेत पार पडावी, यासाठी समितीच्या वतीने सर्व स्वयंसेवक कार्यरत राहतील.

समितीचे आवाहन:

समितीच्या वतीने सर्वजनतेला मिरवणूक शांततेत आणि उत्साहात पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# या नराधमांना मित्र म्हणायचे की हैवान? १९ वर्षीय मुलीवर २३ जणांकडून बलात्कार!

**वाराणसी (उत्तर प्रदेश)**

वाराणसी जिल्ह्यात मानवता हादरवून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. एका १९ वर्षीय तरुणीवर सात दिवसांच्या कालावधीत तब्बल २३ जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे या दरम्यान ती मदतीसाठी मित्रांकडे गेली असता त्या नराधमांनीही आपल्या अन्य मित्रांसोबत तिच्यावर अत्याचार केले. २९ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान आरोपींनी तिला विविध हॉटेल्स, कॅफे आणि हुक्का बारमध्ये नेऊन अमानुष पद्धतीने अत्याचार केला.

पीडित मुलीने कसेबसे आरोपींच्या तावडीतून सुटून घरी पोहोचताच, तिच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत सहा आरोपींना अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (इछड) कलम ७०(१) (सामूहिक बलात्कार), ७४ (विनयभंग), १२३ (विष वा नशा देणे), १२६(२), १२७(२), आणि ३५१(२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

अत्याचाराची काळी सात दिवसांची मालिका

अतिरिक्त पोलीस आयुक्त विदुश सक्सेना यांनी सांगितले की, पीडित तरुणी २९ मार्च रोजी काही मित्रांसोबत बाहेर गेली होती. त्यानंतर ती घरी परतली नाही. ४ एप्रिल रोजी तिच्या कुटुंबियांनी हरविल्याची तक्रार दिली. पुढील चौकशीत तिच्यावर सात दिवसांदरम्यान विविध ठिकाणी क्रूरतेने अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले.

तिच्या कुटुंबाच्या तक्रारीनुसार:

सुरुवातीला ती एका मैत्रिणीकडे गेली असताना एक आरोपी तिला लंका परिसरातील एका कॅफेमध्ये घेऊन गेला आणि बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी रस्त्यात भेटलेल्या आणखी दोन जणांनी तिला नादेसर परिसरात नेऊन पुन्हा अत्याचार केला. त्यानंतर तिला तिसऱ्याने एका कॅफेमध्ये नेले, जिथे आधीच पाच जण होते. तिला नशेचे औषध दिले गेले आणि सर्वांनी बलात्कार केला. १ एप्रिल रोजी दुसऱ्या एका आरोपीने तिला हॉटेलमध्ये नेले, जिथे तिला ङ्गक्लायंटसाठी मालिशङ्घ करण्यास सांगून अत्याचार केला गेला. यानंतर, तिला औरंगाबादजवळील एका गोदामात नेऊन तिघांनी पुन्हा बलात्कार केला. तिथून सुटून ती सिग्रा येथील मॉलबाहेर बसली असताना, पुन्हा एका व्यक्तीने खाण्याचे आमिष देत तिला नशा देऊन अस्सी घाट येथे नेले आणि अत्याचार केला. तिथून सावरून ती एका मित्राकडे गेली, पण तिथेही तिच्यावर बलात्कार झाला. अखेर ती तिथून पळून जाऊन घरी परतली.

सध्या पीडितेची वैद्यकीय तपासणी झाली असून, तिचे मनोबल व मानसिक आरोग्य यासाठी सल्लागारांची मदत घेतली जात आहे. पोलिसानी या प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत इतर आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक कार्यरत केले आहे. दरम्यान, ही घटना केवळ कायद्यासमोर आव्हान नाही, तर समाज म्हणून आपण कुठे आहोत याचा आरसा ठरते. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासन आणि समाजाने एकजुटीने भूमिका घ्यावी, हीच अपेक्षा.

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव २०२५ निमित्त वुमेनिया ग्रुपतर्फे घाटी येथे अन्नदान



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक महोत्सव २०२५ निमित्त वुमेनिया ग्रुप यानी अन्नदान केले घाटी हॉस्पिटलमध्ये अन्नदान करताना चातुर्मास अध्यक्ष पंकज जी फुलफगर समिति के अध्यक्ष स्वप्निल जी पारख, पंकज जी सांखला निलेश जैन बाहुबली वयकोस, प्रतीक साहू जी कुलदीप बाफना परेश जैन मनीष भंसाली सविता लोढ़ा वुमेनिया ग्रुप के अध्यक्ष दर्शना लुनावत सेक्रेटरी वीणा गादिया राखी फूलफगर वनिता छाजेड़ मित्तल जैन सविता भंडारी उपस्थित होते.

## भ. महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित आरतीचे ताट सजावट स्पर्धेने वेधले लक्ष



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भ. महावीर जन्म कल्याणक महोत्सव महिला समिती अंतर्गत अरिहंतनगर महिला मंडळ, बालाजीनगर महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आरतीचे ताट सजविणे स्पर्धा झाली.

आदिनाथ जैन मंदिर येथील स्पर्धेत रांगोळी,पंचरंगी रिबन ध्वज, आरसा, कुंदन, विविध पान -फुले, बांगड्या, तांदूळ, विविध डाळी, साबुदाणा, ट्युशी लेसची फुले, कणकेचे रंगीत दिवे, याचा कल्पकतेने वापर करत मानस्तंभ, परस्परोग्रह जीवाणम,पूर्णाध्यीने आकर्षक आरतीचे तबक सजवले होते.



स्पर्धा संयोजक अरिहंतनगर अध्यक्षा अनिता पहाडे, प्रतिभा पाटणी, वंदना अजमेरा, नीता गडेकर, अर्चना अजमेरा, कुसुम अजमेरा,नीलू गंगवाल, मधु कासलीवाल, वर्षा कासलीवाल, मीना अजमेरा तसेच बालाजीनगर च्या मंगलकासलीवाल ,कविता काला, चारुलता कासलीवाल, रक्कर कासलीवाल यांनी परिश्रम घेतले.

परीक्षक म्हणून पूजा अजमेरा दिशा बडजाते यांनी काम पाहिले. मंगलाचरण तसेच सूत्रसंचालन रूपाली रावका यांनी केले. प्रारंभी स्वप्निल पारख, भारती बागरेचा, संगीता संचेती, सारिका साहूजी, सविता लोढा,मनीषा भन्साळी, ललिता साखला, करुणा साहूजी,निलेश जैन, प्रतीक साहूजी, बाहुबली वायकोस प्रमोद पाटणी, तनुजा गांधी, आदींच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन झाले. यावेळी कविता अजमेरा,नीता गादीया,मंजू पाटणी, मीना पापडीवाल, मेघा सुगंधी, आशा कासलीवाल आदीसह महिला उपस्थित होत्या. अशी माहिती स्पर्धा प्रसिद्धी प्रमुख प्रशांत शहा नरेंद्र अजमेरा पियुश कासलीवाल यांनी दिली.

# स्मशानभूमी समस्या निवारण अभियान; मे अखेर जिल्ह्यातील स्मशानभूमी समस्यामुक्त करण्याचा निर्धार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



ग्रामीण भागातील अंत्यविधीसाठी महत्त्वाची असलेली स्मशानभूमी ही अनेक ठिकाणी दुर्लक्षित राहिलेली आहे. कुठे जागेचा अभाव, तर कुठे रस्त्याचा प्रश्न, काही ठिकाणी ७/१२ वर नोंद नसलेली जागा; या व अशा अनेक अडचणींमुळे अनेक्गावांमध्ये अंत्यसंस्कारासाठी कटू प्रसंगांना सामोरे जाण्याचा प्रसंग येतो.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे ‘स्मशानभूमी समस्या निवारण अभियान’ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान प्रथम चार व शेवटचा एक अशा पाच टप्प्यात राबविण्यात येणार आहे. मे महिना अखेर जिल्ह्यातील सर्व स्मशानभुमीच्या समस्या सोडविण्यात आलेल्या असतील असे नियोजन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

**समन्वयातून उपक्रम**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत ग्रामपंचायतीवर स्मशानभूमीची उपलब्धता आणि देखभाल करण्याची जबाबदारी शासनाची आहे. याच उद्देशाने ग्रामपंचायत, महसूल विभाग, पंचायत समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबवला जाणार आहे.

प्रथम टप्पा (१५ एप्रिल - २२ एप्रिल) : ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येईल. स्मशानभूमी संदर्भातील सर्वेक्षण व अभिलेख व्यवस्थापनाची माहिती दिली जाईल.

द्वितीय टप्पा (२२ एप्रिल - २९ एप्रिल) : ग्रामपंचायत अधिकारी आणि महसूल अधिकारी गावोगावी जाऊन स्मशानभूमीचा आढावा घेतील. वादग्रस्त जागा, रस्ते, नोंदी यांचा तपशील गोळा करतील.

तृतीय टप्पा (२ मे - १० मे) : उच्च अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन गावनिहाय समस्या वर्गीकरण, खर्चाचा अंदाज, ७/१२ सुधारणा, अभिलेख अद्ययावत करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाईल.

चतुर्थ टप्पा (११ मे - २५ मे) : सौंदर्यीकरण, रस्ते दुरुस्ती, शेड उभारणी, वृक्षारोपण आदी कामे प्रत्यक्ष सुरू होतील. लोकसहभागाने गावात वृक्षारोपण कार्यक्रम होतील.

पाचवा टप्पा:संपूर्ण मोहिमेचा दस्तऐवजीकरण अहवाल तयार केला जाईल. लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन माध्यमांतून उपक्रमाची माहिती दिली जाईल.

अभियानाची उद्दिष्ट्ये - उद्दिष्ट्ये: सर्व गावांना सुसज्ज स्मशानभूमी उपलब्ध करून देणे. ७/१२ नोंदी सुनिश्चित करणे. स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यांचे सुशोभीकरण करणे. अभिलेख अद्ययावत करणे. सामाजिक उत्तरदायित्व व अन्य निधीतून सुविधा उपलब्ध करणे.

लोकसहभाग महत्त्वाचा- हा उपक्रम केवळ शासकीय योजना नसून, स्थानिक लोकप्रतिनिधी, छत्रुज, समाजसेवक व प्रतिष्ठित नागरिक यांच्या सहभागातून यशस्वी करण्यात येणार आहे. माध्यमांच्या सहकार्याने जनजागृती केली जाणार आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, ‘स्मशानभूमी समस्या हा केवळ सामाजिक नाही, तर प्रशासनिकदृष्ट्याही संवेदनशील विषय आहे. गावकऱ्यांचा सन्मान राखण्यासाठी आम्ही एकत्र येऊन हा उपक्रम राबवत आहोत. लोकसहभागानेच हे अभियान यशस्वी होईल.’

**जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली आढावा बैठक-** यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आज तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, भुमि अभिलेख आदी संलग्न विभागांची बैठक घेऊन जिल्ह्यातील स्थितीचा आढावा घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, अधीक्षक भुमी अभिलेख विजय वीर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) राजेंद्र देसले, तहसीलदार रमेश मुनलोड हे जिल्हा मुख्यालयातून तर सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी व स्मशानभूमीत आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची असून यासाठी तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी समन्वयाने आढावा घ्यावा. ज्या गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही किंवा काही ठिकाणी जागेसाठी अडचण येत असेल तर त्या सोडवाव्यात व नागरिकांना स्मशानभूमीची जागा आणि सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

ग्रामपंचायत सरपंच आणि सदस्य यांनीही पुढाकार घ्यावा यासाठी गटविकास अधिकारी यांनी लोकसहभाग घेऊन स्मशानभूमीसाठीच्या अडचणी दूर कराव्यात. खाजगी जागेवर असलेल्या स्मशानभूमीबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घेऊन कायमस्वरूपी जागा उपलब्ध करण्याबाबत निर्णय घ्यावा. भूमी अभिलेख कार्यालय, कृषी विभाग यांनीही यासाठी समन्वय ठेवावा.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित म्हणाले की तहसीलदार ,सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करण्यासाठीच्या ज्या काही सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचे तंतोतंत पालन करावे. ग्रामसेवक आणि तलाठी यांनी गाव पातळीवर समन्वय ठेवून काम करावे.

## ४ एकर भूखंडावर वृक्षारोपणाचा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी) : मुंबईच्या हरित क्षेत्रात वाढ व्हावी, तसेच पर्यावरण संतुलनासाठी महानगरपालिका प्रशासनाने कुर्ला, पवई, बोरिवली येथील तब्बल ४ एकर भूखंडावर वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे. या भूखंडावर सुमारे ३.५ हजार झाडांचे पारंपरिक पद्धतीने रोपण करण्यात येणार आहे. या उपक्रमाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून संबंधित प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महानगरपालिका आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. प्रशासकीय मंजुरीनंतर वृक्षारोपणाला सुरुवात करण्यात येणार आहे.

## बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानाचा प्रत्येकाला अभिमान वाटला पाहिजे - पोलिस आयुक्त प्रवीण पवार

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वपक्षीय जयंती उत्सव समितीच्या कार्यालयाचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उस्मानपुरा येथील 'करमकृपा' मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वपक्षीय १३४ जयंती उत्सव समिती २०२५च्या कार्यालयाचे उद्घाटन पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, या शहराला ऐतिहासिक वारसा आहे. २००३ ला मी इथे अपर पोलिस अधीक्षक होतो. २००३ ते २०२५ या कालावधीत हे शहर खूप बदलले आहे. अन्य शहरांच्या तुलनेत या शहराच्या प्रगतीला मोठा वाव आहे. तेव्हा सुभेदारी गेस्ट हाऊसवर एकदा मुलाखतीला आलो असता, 'तुम्हाला संविधानाची उद्देशिका पाठ आहे का' असे विचारण्यात आले. तेव्हा ही उद्देशिका मी म्हणून दाखविली होती, बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानाचा प्रत्येकाला अभिमान वाटला पाहिजे, असे ते म्हणताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

छत्रपती संभाजीनगरात करोडो रुपयांची गुंतवणूक होतेय. त्यामुळे या शहरात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्याची आवश्यकता आहे, असेही पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी सांगितले. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी सांगितले की, कुणालाही अशांतता नको असते. खरे तर ९९ टक्के काम तुम्ही केलेय, असे म्हणून त्यांनी शांततेचे श्रेय जनतेला दिले. समितीचे अध्यक्ष नवीन ओबेरॉय, मुख्य मार्गदर्शक बाबूराव कदम, अरविंद अवसरमोल, छाया जंगले पाटील, अफसर खान, कय्युम, कॉ. भगवान भोजने, इब्राहिम पठाण आदींची भाषणे झाली. पृथ्वीराज पवार, बाळकृष्ण इंगळे, दिलीप पाडमुख, शिवाजी कवडे, लक्ष्मण हिवराळे, वीणा खरे, गील साहेब, अजय चावरिया आदी उपस्थित होते.

## खलनायकांचा भक्तिभाव! ‘कन्नप्पा’ चित्रपटासाठी घृष्णेश्वर मंदिरात घेतले भगवान शिवाचे दर्शन

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे चित्रपटांमध्ये खलनायकाची भूमिका साकारणारे,पण प्रत्यक्षात भक्तिभावाने ओतप्रोत असलेले कलाकार मंगळवारी खुलताबाद तालुक्यातील वेरुळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी दाखल झाले.यावेळी हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय खलनायक मुकेश ऋषी तसेच साऊथ सुपरस्टार प्रभु देवा यांनी भगवान शिवाचे दर्शन घेऊन जलाभिषेक केला. त्यांच्या स्वागतासाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष योगेश टोपरे, विश्वस्त राजेंद्र कौशिके, योगेश विटखेडे आदींनी श्री घृष्णेश्वराची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार केला.मुकेश ऋषी व प्रभु देवा हे दोघेही ‘कन्नप्पा’ या आगामी भव्य फँटसी तेलुगू चित्रपटाच्या प्रमोशनसाठी येथे आले होते. या चित्रपटात विष्णु मंचू प्रमुख भूमिकेत झळकणार असून, प्रभु देवा व मुकेश ऋषी सहाय्यक भूमिकेत दिसणार आहेत. दिग्दर्शनाची जबाबदारी मुकेश कुमार सिंह यांनी सांभाळली आहे. या भेटी नंतर दोन्ही कलाकारांनी मंदिराच्या अध्यात्मिक आणि शिस्तबद्ध वातावरणाचे विशेष कौतुक केले.त्यांच्या भेटी मुळे मंदिर परिसरात भाविकांमध्ये आनंद व उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, 'कन्नप्पा' चित्रपटाचे निर्माते मोहन बाबू हे श्री घृष्णेश्वर मंदिरात आले होते.त्यांनी भगवान शिवाचे दर्शन घेऊन चित्रपटाच्या यशासाठी घृष्णेश्वर चरणी लीन होऊन प्रार्थना केली. ‘कन्नप्पा’ हा ऐतिहासिक महाकाव्यवर आधारित चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित होत असून, तो भगवान शिवाच्या महान भक्ताच्या जीवनकथेला समर्पित आहे.या चित्रपटात मोहनलाल, अक्षय कुमार,प्रभास, काजल अग्रवाल यांच्यासारखे नामवंत कलाकार दिसणार आहेत, तर अभिनेत्री प्रीती मुकुंदन मुख्य भूमिकेत झळकणार आहे.चित्रपट निर्माते मोहन बाबू यांनी सांगितले की, ङ्गहा चित्रपट फक्त एक कथा नाही, तर श्रद्धा, भक्ती आणि त्यागाची अद्वितीय कहाणी आहे, जी प्रेक्षकांच्या मनाला निश्चितच भिडेल. दरम्यान प्रभु देवा आणि मुकेश ऋषी यांना पाहताच मंदिर परिसरात चाहत्यांनी गर्दी करत सेल्फीसाठी झुंबड उडवली.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816